Your Posts 2025

जानेवारी २०२५

यापुढे मराठीतील काही महत्त्वाच्या कवींच्या कविता आणि त्या कवितांवर केलेली टिप्पणी तुम्हाला येथे वाचायला मिळेल. श्री चंद्रकांत प्रभाकर देशपांडेंनी नुकतेच त्यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध केले याआधी त्यांचा कोरी कविता हा संग्रह प्रसिद्ध झाला होता. आज लिफाफे या संग्रहातील एका कवितेबद्दल आपण बोलूया.

एका नात्याची रचना

समज की माझ्या पाठीला पोक जन्मतःच होतं.
'म्हणजे अमुक एका प्रकारे आयुष्य जगावं
किंवा अमुक एक समजूत किंवा दृष्टिकोण
…म्हणजे हे तुम्हाला कधी आलं?'
खरं म्हणजे ही मुलगी माझ्यावर प्रेम का करते अजूनही मला कळलं नव्हतं किंवा तिच्या
साडीवर आज कमळच का हेही…
मी तसा कधी विचार केला नाही,
मला सांगता येणार नाही.
'तुम्ही मला आवडता कारण तुम्ही
वेगळे आहात.. पोक महत्त्वाचं नाही…'
माझ्या पाठीचं ओझं बघणारेच फार वाहतात
आणि वेगळा म्हणजे कसा?
सगळ्या धोक्यांतूनही सहीसलामत सुटून जाणारा?
'नात्याची पक्की कल्पना आली की
नातं संपून जातं…. तुम्ही संपत नाही.. '
मी संपत नाही हे खरं नाही.
न संपणारं आणखीनच काही असेल.
'पण तरीही आपली भेट व्हायला नको होती.
माझं संपूर्ण आयुष्य धोक्यात आलं आहे..'
तुझ्या साडीवर आज कमळ असण्याइतकं?
'त्यात आणखी हा सूर्यास्त…'

ही कविता संवादाच्या स्वरूपातली आहे. कवी सिद्धहस्त नाटककार देखील आहे, त्यामुळे असेल तसे. कविता ही प्रामुख्याने उद्गारच असते. कविता आणि नाटक हे एकमेकांच्या जवळचे साहित्यप्रकार आहेत. ते प्राचीन साहित्य प्रकार आहेत. आणि तेव्हापासून मुलतःच ते सार्वजनिक आविष्काराच्या रूपात होते. या उलट कादंबरी व कथा

आधुनिक व्यक्तीवादाला अनुरूप असे साहित्य प्रकार असल्याने ते खाजगी प्रकार आहेत. आधुनिक कविता व्यक्तीच्या जाणीवा आणि नेणिवांच्या खोलीमध्ये जाण्याचा कितीही प्रयत्न करत असली तरी ती आपली प्रायोगिकता म्हणजे प्रयोग सादर करणे या अर्थाने, हे रूप फारसे मागे टाकू शकलेली नाही. कवितेमधील अतिशय व्यक्तिगत खाजगी अनुभव चव्हाट्यावर येतोच येतो.

या कवितेत दोन व्यक्तींचा त्याचा व तिचा संवाद आहे. हे दोघे मनातलेपण असू शकतात किंवा प्रत्यक्षातले. त्या दोन व्यक्तींचे स्थान मनात आहे का प्रत्यक्षात? ही संदिग्धता या कवितेसाठी महत्त्वाची आहे. संवाद एक घटना असते आणि घटनेच्या मुळाशी आकस्मिकता किंवा अपघात असतो. घटना ही पहिली/सुरुवात किंवा अंतिम/ शेवटची कधीच नसते. ती नेहमी मधली असते. कसलाही आगापिच्छा नसलेली. आणि म्हणूनच ती अधांतर झोतात आणते. तो तसा का बोलतो? ती त्याच्या प्रेमात का आहे? ती तसे का म्हणते? सूर्यास्त का होत आहे? आणि तिच्या साडीवर कमळे का आहेत? त्याच्या पाठीवर पोक का आहे? या गोष्टींना कुठलेही कारण नाही. आणि कारण असण्याची गरजही नाही. कारण ही घटना आहे.

हे ह्या कवितेच्या धाटणीमध्येच असलेले अमर्याद स्वातंत्र्य कवितेचा आशय रद्द करण्याचा प्रयत्न करतोय. म्हणजे कवितेचा आशय कवितेच्या रूपाशी दगाफटका करतोय. आता बघा, त्याच्या पाठीवर पोक आहे याचा लगेच अर्थ पुढच्याच ओळीत दिला जातोय. हे प्रत्यक्ष शारीरिक वैगुण्य आहे, का हे पोक रूपकात्मक आहे हे संदीग्ध आहे. आयुष्य असं जगावं ही धारणा किंवा एखादा दृष्टिकोन वा समज हेच एखाद्या माणसासाठी पोकासारखे वशिंडाप्रमाणे वाटू शकतं. त्या पूर्वग्रहाचे ओझे वागवत माणूस जगत राहतो. पण तरीही सगळ्यांना पोक नसते. पोक असणारा म्हणजे आपल्याच पूर्वग्रहांची आत्मजाणीव असणारा माणूस विरळाच!

इतरांना कळतही नाही की आपले पूर्वग्रह परंपरा, समज किंवा ज्ञान आपल्याला सहजतेने, नैसर्गिकरित्या जगू देत नाहीत. एखाद्या ओझ्यासारखे आपण आपले ज्ञान वागवतो. आणि ही चिकित्सक आत्मजाणीव नसली तर इतरांना देखील आपल्या पाठीवरचे पोक दिसत नाही. ज्याच्या पाठीवरती असलेले पोक ज्याला जाणवते तोच वाकून चालतो. बाकीचे पोक असूनही ताठ चालतात.

जसे त्याच्या पाठीवरती पोक आहे, तसेच तशीच तिच्या साडीवरती कमळे आहेत. आणि तसाच सूर्यास्तदेखील होऊ घातला आहे. या तिन्ही गोष्टी धोकादायक आहेत. जीवघेण्या आहेत. त्यामुळे ती म्हणते आपण भेटायलाच नको होते. तिचे आयुष्य धोक्यात आले आहे. तो कितीही वल्गना करत असला की धोक्यांमधून तो सहीसलामत निसटतो तरीही हा धोका खराखुरा आहे.

हा कसला धोका आहे? तर हा धोका प्रवाहाला खीळ बसण्याचा आहे. प्रेमात पडणे हे धोकादायक आहे कारण तिथे तुमचे सर्व स्वातंत्र्य संपते. साडीवर कमळे असली की साडीवर इतर काही असू शकत नाही आणि सूर्यास्त झाला की दिवस संपतो. या सगळया डेफिनेटिव्ह गोष्टी आहेत. अमूर्त शक्यता संपवणाऱ्या अशा या घटना आणि ही कविता या धोक्यांना पेश करते ही या कवितेची खासियत आहे.

राहुल पुंगलिया.

पुढील संग्रहाचे काम करता करता मध्येच ही एक कविता इथे ---

कंटाळा

कंटाळा हा एक जीव आहे
असे समजून
आधी त्याचे दात पाडले
तेव्हा आलेल्या रक्ताचे
अत्तर करून मग ते
फर्निचरला चोपडले
त्या दुर्गंधित आभासात बसून
एक कादंबरी वाचताना
तिच्यातली सगळीच पात्रे
कोरोनाकाळात गेली
तीही म्हणू लागली
कण्हत विव्हळत की साला
खूप खूप कंटाळा आलाय

--- ००० ---

उधळपट्टी

प्रायोगिक नाटकांसाठी कधी वर्गणी काढली असेल तेवढीच. बाकी म्हणजे काही वर्षे दारूवर झालेला खर्च. ना ट्रिपा मारणे ना परदेश पाहण्याची हौस  ना ताजमहाल ना काश्मीर. उधळपट्टी म्हणावी असे फारसे काही केले नाही. वाचन आणि लेखन यांवर वेळेची आणि शक्तीची उधळपट्टी मात्र केली. पण ती काही आर्थिक नाही म्हणता येणार. ती आता करत आहे. स्वत:चीच पुस्तके स्वत:च काढून. एखादा प्रकाशक तयारही झाला असता या कामाला, पण, एकेका पुस्तकाला त्याने किमान सहा सहा महिने तरी लावले असते. मला मी आजवर लिहिलेले, किरकोळ दुरुस्त्यांसह अंतिम करून ते लौकरात लौकर पुस्तक रूपात आणायचे होते. म्हणून ही सर्व जबाबदारी मीच उचलायचे ठरवले. यात अनेकांची साथ मिळत गेली. तर यासाठी होणाऱ्या खर्चाला उधळपट्टी म्हणता येईल. हे सर्व कुणाला हवे आहे का, कुणी वाचणार आहे का आणि कुणी हे वाचावे तरी का – अशा कोणत्याच प्रश्नांची सर्वमान्य अशी उत्तरे नसताना मी ही कामे करत आहे. आता, हे तरी करायची काय गरज होती, हा प्रश्न आहेच ! मराठीत काही आनंदयात्री असतात तसा समजा  मी एक निरर्थतायात्री ( खरे तर मी कोणतेच लेबल स्वीकारत नाही ) आहे – मग तर याची अजिबातच गरज नव्हती. हे तर स्वत:लाच खोडून काढणे झाले ! यावर एक कामचलावू उत्तर डोक्यात ठेवलेले आहे, ते असे – लेखन सगळे नुसते निरर्थकतायुक्त होते म्हणण्यापेक्षा निरर्थकच होते, असे समजू. त्याचे www.champralekhan.com हे संकेतस्थळ काढायचाही निरर्थकपणा केला तर आता हे सर्व पुस्तक रूपात आणून तो निरर्थकपणा पूर्णच का करू नये ? हे तरी बरोबर आणि खरे आहे का, कोण जाणे. काय असेल ते असो. ही

पुस्तके काढायचे काम वेगात पूर्ण करणार आहे ! मग एखाद्या मुलाखतीत मी म्हणेन की मनात होता तो सर्व निरर्थकपणा पूर्ण केल्याने आता मी तृप्त आहे, समाधानी आहे, वगैरे ! सारांश म्हणजे लौकरच येत आहे पुढील कवितासंग्रह –' इटालियन जॉब चा शेवट ' ( या अभिजात मराठीची क्षमा मागून, अर्थात -- )

--- 000 ---

माझे पहिले नाटक सादर करणारे आणि त्यावर दिलखुलास प्रतिसाद देणारे कोल्हापूर !

( तिथे ' मन ' चा प्रयोग )

अप्रतिहत

वाह्यात शब्दांना आवर घालता येईना
म्हणून सर्व गाड्या रद्द केल्या
त्या गाड्यांनी जाणार होतो मीच
पण माझ्या मिश्यांची जन्मशताब्दी
साजरी करण्यासाठी
मला थांबावे लागले
अप्रतिहत म्हणजे काय
हे मला ठाऊक नव्हते
खरे तर आजही नाही
तरीही देवापुढे नेमाने दिवा लावावा
तशी पाणीकपात चालू ठेवली
जनता निर्लज्ज असते
आपल्या दुःखांचे भांडवल करून
ती सर्व संस्कृतीनाशाचे
समर्थन करते
कोणत्याही कारणाने सिग्नलव्यवस्था
कोलमडता कामा नये हे सांगूनही
खरेदीला निघून जाणारे महाभाग
असलेल्या या देशात
सौख्य कुठले नांदणार
बेरोजगारीची समस्या एकदा सुटली
की सगळ्या गाड्या वेळेवर सुटतील
या आशेवर चालू राहते माझे मिश्या

वाढवणे आणि त्यांना पीळ देणे

चंप्रंच्या ‘खुल जा सिम सिम’ या कवितासंग्रहामधील ही कविता. ही कविता दोन-तीनदा वाचली की लगेच ध्यानात येते की या कवितेचा अर्थ लावणे शक्य नाही. अर्थासाठी कविता वाचणारे वाचक पैश्यांच्या मोबदल्यात सामान मोजून घेणाऱ्या गिऱ्हाईकांसारखे असतात. “आम्ही वाचण्याचे कष्ट घेतले, अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचले त्यामुळे आम्हाला कळायलाच हवे,की या कवितेत काय म्हटले आहे”अशी त्यांची 'रास्त' अपेक्षा असते. या कवीचा हेतू काय आहे? हा कवी आपल्याला काय संदेश देत आहे? किंवा काय दृष्टिकोन देत आहे? समाजाच्या कुठल्या समस्येवरती हे भाष्य आहे?हे कळले की त्यांचा जीव भांड्यात पडतो.

एकदा कवीचे भाष्य, संदेश कवितेचा अर्थ कळला की ह्या प्रकारचा वाचक, तो अर्थ तर्कसुसंगत आहे का, आणि योग्य व सत्य आहे का, हे देखील तपासून बघतो. ही पडताळणी त्याला अगोदरच ठाऊक असलेल्या ज्ञानाच्या आधाराने होते. त्या त्याच्या ज्ञानाशी, माहीत असलेल्या दृष्टिकोनाशी कविता जर सुसंगत असली तर ती त्याला भावते. थोडक्यात त्याला आधीच काय ते सत्य ठाऊक असते. त्याचा दृष्टिकोन कविता वाचण्यापूर्वीपासूनच योग्य असतो आणि कविता केवळ त्या दृष्टिकोनाला व ज्ञानाला दुजोरा देण्याचे काम करते. त्याचा काव्या अनुभव दांभिक व उपाहासवृत्तीने (cynical) होतो.

आपला नवसाक्षरांचा समाज आहे. या समाजात लिहिणे वाचणे एक तर प्रॅग्मॅटिक कारणांसाठी होते किंवा भाषेला पवित्रतेचे वलय तरी असते. एका बाजूला ज्ञान माहिती संदेशाचे वहन करणारी भाषा तर दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक किंवा राजकीय मुक्तीकडे नेणारी भाषा हे दोनच भाषेचे व्यवहार महत्त्वाचे समजले जातात. मघाशी कवितेच्या अर्थनिर्णयनांमधील दांभिकपण मी वर्णन केले. आधीच परिचित असलेला अर्थ नवनव्या कलाकृतींमध्ये पुन्हा पुन्हा पाहीला जातो.इतर भाषेच्या वापरात देखील या प्रकारची उपहास वृत्ती दिसत असते. सगळेच सगळ्यांना ठाऊक असते. म्हणून कोणालाच कशाचे आश्चर्य वाटत नाही. आपला नेता किंवा राजकीय पक्ष खोटं बोलत आहे हे सहज समजून घेतले जाते. जर्मन विचारवंत पीटर स्लॉटरडाईकने या सिनिकल रीझन असे म्हटले आहे. साहित्यातील किंवा राजकारणातील हा दांभिकपणा एक्सपोज केल्याने काही होत नाही, कारण त्या दांभिकपणामध्ये जाणीवपूर्वक सगळेच सहभागी असतात. विद्यमान हिंदुत्ववादी सत्ताधारी असत्या मागून असत्य बोलत असतात हे सगळ्यांनाच माहीत आहे वेगवेगळ्या प्रकारचे सांख्यिकी अहवाल बदलण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. आता याला उपाय म्हणजे सत्य सांगून लोकांचे डोळे उघडणे असे कोणाला वाटू शकते. मात्र या

सत्योत्तर काळात लोकांचाही या खोट्या आयडिओलॉजीमध्ये सहभाग असतो. या परिस्थितीत सत्याचे स्थानदेखील केवळ अनेक कथनांपैकी एक कथन, अनेक संभाषितांपैकी एक संभाषित असे बनते. सत्याची अधिकृतता नष्ट होते. याचे अ-वास्तव, का त्याचे अ-वास्तव स्विकारायचे एवढेच वादाचे स्वरूप बनते. आपण हे नीट पाहिले असले, तर हिंदुत्ववादी विचारवंतांमध्ये नॅरेटिव किंवा कथन आणि डिस्कोर्स किंवा संभाषिते हे दोन सोफिस्टिकेटेड सैद्धांतिक शब्द लाडके झालेले दिसतात. कारण सत्य म्हणून काही एक नसते असा त्यांचा सोयीचा आणि गाढ विश्वास आहे. अशी परिस्थिती आधुनिक कवितेला उत्साहदायक वाटायला हवी कारण सत्य व वास्तवाची सापेक्षता, भाषेची निरर्थकता या कवितेने नेहमीच अधोरेखित केली आहे. अस्मितेच्या सर्वच कथनांमध्ये किंवा संभाषितांमध्ये सत्य हे फारसे महत्त्वाचे नसते इतिहास म्हणजे भूतकाळाचे वास्तव दर्शन नसते तर आपापल्या आयडिओलॉजीनुसार

असलेली विविध, एकमेकांना पर्यायी अशी कथने असतात. त्यामुळे कधी रामदास स्वामी आणि शिवाजी महाराज यांच्या संबंधांबद्दल विवाद होतात तर कधी सावित्रीबाई फुले आणि फातिमा बी यांच्या संबंधांबद्दल. सत्य हे मूल्य धोक्यात आलेल्या काळात आधुनिक किंवा उत्तर आधुनिक कवीता या निरंकुश कथनांच्या धोकादायकरित्या जवळ येते.

तरीही कवितेतील अ वास्तव किंवा निरर्थकता ही वेगळी आहे. या कवितेच्या संदर्भात ती कशी वेगळी आहे हे आपल्याला आता बघायचे आहे. 'अप्रतिहत' या कवितेची पहिलीच ओळ  कवितेचे गुपित उलगडते.
" वाह्यात शब्दांना आवर घालता येत नाही" शब्दांना स्वतःचे भौतिक अस्तित्व आहे. शब्द केवळ अर्थवहनाची साधने नाहीत.  साहित्य या कलाक्षेत्रात भाषेला संवादापासून, संदेश वहनापासून स्वातंत्र्य मिळते. सद्यकालीन सिनीसिझममधून भाषावापराची निर्देशनापासून झालेली मुक्तता आणि कवितेतील शब्दांच्या पार्थिवतेचा उत्सव यामध्ये फरक आहे. (सिनिकल रिजनला) कुत्सित  विवेकाला सत्य आणि असत्य यामधील फरक चांगलाच माहीत असतो. आणि तो फरक माहीत असून देखील
सत्योत्तर राजकारणी, सामाजिक विचारवंत रेटून खोटे बोलत असतात.

बाबरी मशिदीच्या जागी राम जन्मभूमीच्या  खुणा पुरातत्वज्ञांना सापडल्या नाहीत. त्या सापडणार नव्हत्याच. हे नवहिंदुत्ववाद्यांना चांगलेच माहीत होते. ते तसे सिद्ध झाल्यानंतरदेखील न्यायपालिकेने केवळ लोकभावनांचा, आक्रोशाचा आदर करून ती जागा हिंदुत्ववाद्यांना बहाल केली. यात सत्य व न्यायाचा बळी गेला. गेल्या दहा वर्षात भारताचा विकास होत नाही आहे दारिद्र्य दैना वंचना वाढत आहे. भारत महाशक्ती होण्याऐवजी सर्वात दरिद्री देशांच्या पंक्तीत बसत आहे. हे देखील सगळ्यांना ठाऊक आहे. तरी देखील या अपयशी नेतृत्वाचा निवडणुकीत वारंवार विजय होतो.  सत्योत्तर काळात सत्य व असत्य यामधील भेद नाहीसा होत नाही. उलट तो अधिकाधिक भेदकरित्या स्पष्ट होत जातो. केवळ जाणूनबुजून खोटे बोलणे सवयीचे होऊन जाते.

याउलट साहित्य हे वारंवार दाखवत राहते की संवाद शक्य नाही. भाषा  अविश्वसनीय, धोकादायक आहे. एका मनाचे दुसऱ्या मनाला कळणे ही भ्रामक कल्पना आहे. किंवा भावुक गैरसमज आहे. भाषा घातपात करू शकते. भाषेपासून सावध रहा, भाषेला गृहीत धरू नका,असा संदेश त्या भाषेतील साहित्य देत असते. साहित्यानुभवातून परतलेला माणूस बदललेला असतो. तो पूर्वीचा बेसावध व निरागस उरत नाही. भाषा त्याची बटीक राहिलेली नसते. एकेकाळी पारदर्शक असलेली भाषा आता स्वतंत्र व्यक्तिमत्व धारण करते. सर्वच कला आपल्या माध्यमांना स्वातंत्र्य बहाल करतात. ज्याला चित्रं पाहता येतात त्याच्यासाठी रंग, रेषा,आकार,छाया व प्रकाश अनोळखी होऊन जातात. परिसरातील
दृश्यमानता स्वायत्त होते. ती दृश्ये माणूस नवलाईने न्याहाळू लागतो. गायन व संगीत देखील नाद स्वरांबद्दल हेच करते.

आता कवितेच्या सुरुवातीलाच जर शब्द वाह्यात आहे अशी कबुली दिली की यापुढील कवितेतील शब्द निमुटपणे आपल्या अर्थांना पाठीवर घेतलेले हमाल कसे बनतील? गाड्या जागच्याजागी थांबणारच आणि मिशांची जन्मशताब्दी साजरी होणारच. एरवी सुद्धा आपण जेंव्हा थोर ऐतिहासिक पुरुषांच्या जन्मशताब्या साजऱ्या करतो, त्यांच्या चित्रांना किंवा छायाचित्रांना हार घालतो तेव्हा त्या माणसांना स्मरतो का त्या भरघोस मिशांना हार घालत

असतो? माणूस गेल्यानंतर त्याच्या मिशाच, फोटोतल्या उरतात. आणि जन्मशताब्दी मिशांचीच होते. हे देखील शब्दशः खरे आहे. तसेही जिवंत असताना कितीतरी जण आपापल्या मिशा किंवा केसांचा कोंबडाच असतात.

या कवितेचे नाव आहे अप्रतिहत. अप्रतिहत म्हणजे सातत्य किंवा कधीही न थांबणे, कधीही पराभूत न होणे. या कवितेतील विधाने आपल्यासाठी अतिपरिचित सामाजिक व राजकीय वल्गना आहेत. दोन गोष्टींचा एकमेकांशी संबंध जोडून त्यातून भलतेच निष्कर्ष काढणे हे समाजामधील स्वतःला शहाणी समजणारी माणसे करत असतात. त्याची काही उदाहरणे कवितेत दिसतात . पुढची चारही कडवी अशा पोकळ सामाजिक शहाणीवेची उदाहरणे आहेत. देवापुढे दिवा लावणे आणि पाणी कपात होणे या अप्रतिहत गोष्टी आहेत. त्या नित्यनियमाने होतात. गाड्या नेहमीच वेळेवर सुटत नाहीत. बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण कधी व्हायचे नाही. सिग्नल व्यवस्थेकडे लक्ष द्यायचे सोडून लोक खरेदीला जात राहतील, आणि आपल्या दैन्य दुःखाचे कारण देऊन लोक संस्कृतीनाशाचे समर्थन पुरवतील. या गोष्टी देखील अप्रतिहत आहेत. या होतच राहणार आणि कवितेतील (Persona) प्रवक्ता मिशा वाढवून त्यांना पीळ देतच राहणार.

या गोष्टींची रुटीन, कंटाळवाणी आणि क्षुद्र नियमितता आपल्या समाजाचा कालक्रम ठरवते. या गोष्टींना आवर घालता येत नाही. त्यामुळे पहिल्या कडव्यातील गाड्या थांबवणे ही वल्गना ठरते. अप्रतिहत या शीर्षकाला अनुसरून ही कविता उलगडली तर ती सामाजिक कालिकतेचे( टेम्पोरॅलिटीचे) स्पष्टीकरण देते. नेहमीच होणारी पाणी कपात आणि रोज देवापुढे लावला जाणारा दिवा, उशिरा धावणाऱ्या गाड्या आणि उशिरा नोकरी मिळणारे लोक, जयंत्या जन्मशताब्द्या आणि पुण्यतिथ्या या सगळ्या नियमित घटनांमुळे समाजाला काळाची परिमिती मिळते. समाजाला काळाचे भान येते. अप्रतिहत हे शीर्षक सुचवते तसे, काळ हाच या कवितेचा विषय आहे. जुन्या संस्कृतींचा नाश कालपटलावर होतो. जुन्या सत्ताधार्यांची संस्कृती नष्ट करून नव्या सत्ताधाऱ्यांची संस्कृती प्रचलित होते. जुन्या दुःखांचे भांडवल करून नवे सत्ताधारी आपल्या नव्या सामाजिक रचनेचे समर्थन करतात.

साहित्यामधील शब्दांचा अनावरपणा, वाह्यातपणा आणि सर्वसामान्य जीवनामधील घाणेरडे रुटीन यामध्ये सरळसरळ विरोध आहे.  कवी कवितेमधील वाह्यात शब्दांनी गाड्या थांबू शकतो. स्वतःची जन्मशताब्दी साजरी करू शकतो. मिशा वाढवू शकतो आणि त्यांना पीळ देऊ शकतो. जेव्हा सर्वसामान्य माणसे खरेदीला जातात आणि जुन्या संस्कृतींचे नाश करतात, रोजगारांचा शोध घेतात पाणी कपात करतात व सहन करतात आणि देवापुढे दिवे लावतात. कविता अप्रतिहत नसते. काळापुढे ती अगतीक होत नाही तर कविता कालातीत असते.

राहुल पुंगलिया

राहुल पुंगलियांनी आज माझ्या एका कवितेवर अपवादात्मक सखोल लिहिले आहे -- त्याला जोडून हीही एक कविता वाचा –

नाव

त्याची बहुसंख्या होती

हवे तेव्हा तो मोर्चे काढू शके

त्याच्या आवडत्या शर्ट
कंपनीचे नाव बदलून
त्याने मानसिंग शर्ट करून घेतले
नंतर मानसिक ग्रिप नीट यावी म्हणून
त्याने बुटाच्या
कंपनीचे नाव बदलून
खंबीर बूट करून घेतले
मग आले त्याच्या लक्षात
की त्याच्या बायकोवर त्याचे खूप प्रेम आहे
त्यामुळे एका मॉल चेनचे नाव
मालती मॉल झाले रेलचेल सुचवणारे
अंडरपँटचे नाव दिसणार नसले तरी
त्या कंपनीचे नाव बदलून
त्याने ते तत्पर पँट करून घेतले
एक शक्तीचे प्रतीक म्हणून
त्याला लागणाऱ्या रेचकाचे नाव
त्याने भरधाव करून घेतले
शिवाय त्याला
लता मंगेशकरची गाणी आवडत
ते नाव त्याने मनस्वी भूलकर केले
त्याचा देश धर्म जात
यांची नावे बदलायला
कुणी मोर्चात यायला तयार नव्हते
ती मात्र असू देत आहेत ती
असा त्याने समजुतदारपणा ठेवला
अशी पाचेकशे नावे बदलल्यावर
आले त्याच्या लक्षात च्यायला
आपली स्वत:ची ओळखच गेलीय बदलून
त्यामुळे आपणच स्वत:लाच परके झालोय
तेव्हा मात्र तो घाबरला
आपण जिवंतच नाही आहोत आता
तर या बदललेल्या नावांचा उपयोगच काय असे झाले

--- ००० ---

आता विक्रीसाठी उपलब्ध आहे --

" इटालियन जॉब चा शेवट ' ( कवितासंग्रह )

पाने २०० किंमत रु.३००/- सवलतीची किंमत रु.२२५ ( पोस्टेजसह )

ज्यांना हवे असेल त्यांनी मेसेंजर मध्ये संपर्क साधावा म्हणजे पैसे पाठवण्यासाठीचा तपशील दिला जाईल.

माझ्या पुस्तकांच्या विक्री किंमतींबाबत माहिती ---

| पुस्तकाचे नाव | प्रकाशन दिनांक | पाने | किंमत रु. | सवलतीची किंमत ( पोस्टेजसह ) |
|---|---|---|---|---|
| १. आवर्तने ( कविता-आशय-आकलन ) | २०२३ | २३२ | ४५० | ३४० |
| २. चार पुरुषार्थांची चार नाटके | १०-०८-२२ | २९८ | ६०० | ४५० |
| ३. वस्तू आणि इतर सहा दीर्घांक | २०-१०-२३ | ३२१ | ४०० | ३०० |
| ४. पाच ॲब्सर्ड नाटके | २५-११-२३ | ३८५ | ५०० | ३७० |
| ५. खुल्लम खुल्ला ( एकांकिका संग्रह ) | २०-१२-२३ | २६७ | ४०० | ३०० |
| ६. नाणेफेक आणि इतर पाच नाटके | २५-०३-२४ | ३८४ | ४०० | ३०० |
| ७. ओळख परेड ( एकांकिका संग्रह ) | ०७-०६-२४ | २८६ | ४०० | ३०० |
| ८. औट घटकेचे राज्य ( कवितासंग्रह ) | ०२-०८-२४ | १९८ | ३०० | २२५ |
| ९. लिफाफे ( कवितासंग्रह ) | ३०-०८-२०१४ | २१९ | ३०० | २२५ |
| १०. खुल जा सिम सिम ( कवितासंग्रह ) | ०७-१०-२०२४ | २८५ | ४०० | ३०० |
| ११. जमेल तेवढा तर्क ( कवितासंग्रह ) | ३०-११-२०२४ | ३३३ | ४५० | ३५० |
| १२. माझ्या आजोबांची सही ( कवितासंग्रह ) | ३०-१२-२०२४ | ३८६ | ४५० | ३५० |

१३. इटालियन जॉब चा शेवट २९-०१-२०२५ २०० ३०० २२५

( कविता संग्रह )

एकूण --- --- --- ५३५० ४०३५

रु.४०३५ /- चा वरील तेरा पुस्तकांचा पूर्ण संच विकत घेणाऱ्यास ‘ तंबाखूची टपरी ‘ हा जगातल्या ५८ कवींच्या काही कवितांच्या अनुसर्जनांचा कविता संग्रह मोफत मिळेल.

प्रत्येक सवलतीची किंमत पोस्टेजसह आहे.

पुस्तक वा पुस्तके हवी असल्यास मेसेंजर मध्ये संपर्क साधावा म्हणजे पैसे पाठवण्याबाबतचा तपशील दिला जाईल.

धन्यवाद, डॉ. हमीद दाभोलकर ---

( मन बाबत बाईट )

Shared with Public

हिंदू एकता

माणूस हा एक भित्रा प्राणी आहे. आपण नाहीसे होण्याला तो घाबरतो. त्याला त्या कल्पनेनेही असुरक्षित वाटते. बुद्ध ‘ शून्य ‘ म्हणतात, सार्त्र ‘ नाथिंगनेस ‘ म्हणतो, तुकाराम ‘ रिकामीक ‘ म्हणतो, जे. कृष्णमूर्ती ‘ एम्टीनेस ‘ म्हणतात, आणि योगवासिष्ठ म्हणते की मन शांत झाले की काहीच उरत नाही.. हे सगळे खरे असावे असे वाटणारे आणि हे खरे असणे शक्यच नाही असे वाटणारे, सर्वच लोक आपापली ओळख निश्चित आणि घट्ट करून आपले असणे पक्के करत राहतात असे दिसते. नसण्याच्या भीतीतून येणारी ही धडपड असते. पण, अशा ओळखी ठळक करत जाण्यामुळे प्रत्येक व्यक्ती व समूह वेगळा पडत जातो आणि उघड वा छुपेपणाने एकमेकांच्या संघर्षात जगू लागतो. या प्रकारात, अत्यावश्यक वाटणारी सुरक्षितता उलट सतत धोक्यात येत राहते. कारण आपापल्या खात्रीसाठी प्रत्येकजण जगत-वागत असल्याने एकमेकांशी संघर्ष आणि एकमेकांवर आक्रमणे अटळ होतात. .छोट्या छोट्या मारामाऱ्यांपासून युद्धांपर्यंत काहीही घडत राहते आणि असंख्य लोक ‘ शूरपणे ‘ मृत्युमुखी पडत राहतात. असे मरण्याला एक उदात्तता बहाल केली जाते. ही पद्धत जगभर पूर्ण मानवजातीला नुसती मान्यच नव्हे तर अटळ वाटत असते.

यातून मग जातीय संघटन समर्थनीय मानणारे पुरोगामी धार्मिक संघटन मात्र फूटपाडे आणि अहितकारक असल्याचे ज्ञान देत राहतात. त्यात, लोकशाही व निवडणुकांचे राजकारण यांतून, डावलले जाणे, मानापमान होणे, अन्याय वाटणे, असे प्रकार घडत राहतात. प्रत्येकाला व्यक्तिगत, जातीय वा पक्षीय सुरक्षितता संभाळत यशस्वी व्हायचे असते. एका भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर अ ने ब चा द्वेष करणे योग्य, पण, तशाच दुसऱ्या एका भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर क ने ड चा द्वेष करणे प्रतिगामी असल्याचे काहीजण बोलत राहतात. यातून सर्वांच्याच शब्दांच्या किंमती घसरत जातात आणि सगळ्यांचा फक्त आपमतलबीपणाच चालू असतो हे सगळ्यांच्याच लक्षात येत जाते. ,त्यामुळे कुणी सात्त्विक, सत्यवचनी आहे असा सर्वच भ्रम संपुष्टात येतो.

जगातले सगळेच देश आणि धर्म आपापले क्षेत्र, जमीन, शाबूत ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न करत असताना फक्त भारताने वा हिंदूंनी ‘ चांगले ‘ वागावे, असे म्हणता येत नाही. सर्वांच्या जगण्यात असणारी भीती त्यांच्याही जगण्यात असतेच. आपण खूप समजूतदार आणि समावेशक, उदार विचारांचे आहोत, असे दाखवण्यात काही काळ सुखात

जाऊ शकतो पण कायमच ते चालू शकत नाही. मग येतो प्रश्न अधिक मोठी आणि टिकाऊ ‘ ओळख ‘ निर्माण करून ती जोपासण्याचा. त्या ओळखीतून आपली सुरक्षितता अबाधित राहील अशी तरतूद करण्याचा. यातूनच बीजेपीकडून हिंदुत्व आणि राष्ट्र या दोन मोठ्या ओळखी घेण्यात आल्या. इथे याहून मोठ्या ओळखी निर्माण करता येणे शक्य नाही. त्यामुळे, तथाकथित पुरोगामी, उदार आणि विवेकी लोक आता त्यांचा त्यांचा मतलब साधण्यात मागे पडत जाणार आहेत, असेच दिसते.

भीती हा जगण्याचा पाया नसेल असे जगता येऊ. शकते का, असा प्रश्न कुणीही स्वत:ला विचारायचा नाही, हे पक्के ठरलेले आहे. किंवा तसे जगता येऊच नाही शकत असा निष्कर्षही सर्वांना मान्य आहे.

‘ ओळख ‘ घडवण्याच्या या जीवनावश्यक खेळात बीजेपीने इतर सर्वांना खूपच मागे टाकले आहे, असेच दिसते आहे. सारांश, धार्मिक पायावर एकता म्हणजे फूट पाडणे, हे बडबडत राहण्यात आता फारसा काही अर्थ राहिलेला दिसत नाही. शिवाय, एक जागतिक सत्य सतत दिसत असतेच की अण्वस्त्रधारी राष्ट्रेच एकमेकांशी सौहार्दाने आणि प्रेमाने वागू शकतात. एवढेच नव्हे तर जागतिक शांततेचा मक्ता त्यांच्याकडेच असतो ! हे सत्य मानवी जगण्यात सगळीकडेच निरपवादपणे प्रभावी असणार ना !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

अमेरिका फर्स्ट

( आधी अमेरिका – अमेरिकेचे हित – तिचा फायदा – बाकीचे जग गेले तेल लावत – मानवी हक्क गेले तेल लावत – लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता गेले तेल लावत ! वगैरे. )

ही आहे ट्रंपांची अध्यक्ष झाल्या झाल्या केलेली गर्जना ! याला कुणाचीही पहिली प्रतिक्रिया काय येणार ? तर बघा, कित्ती  वाईट ! कुणीही असे वागू नये खरे तर ! पण डोळे उघडून बघितले तर सगळीकडे हेच दिसते – रशिया फर्स्ट, चीन फर्स्ट, इस्राइल फर्स्ट, पाकिस्तान फर्स्ट, इंडिया फर्स्ट, ख्रिश्च्यानिटी फर्स्ट, इस्लाम फर्स्ट, हिंदुत्व फर्स्ट, तमिळ फर्स्ट, हिंदी फर्स्ट, मराठी फर्स्ट, वगैरे.  आपण समजा मराठी, हिंदू, भारतीय माणसाला पकडले आणि त्याला म्हणू लागलो की बाळा, तू भाषिक, धार्मिक, राष्ट्रीय अभिमान नको बाळगूस – अशाने माणसा माणसात फूट पडते ! आणि अशी फूट पडणे वाईटच नाही का ? नको वागूस असा. तर तो काय उत्तर देईल ते आपापल्या कल्पनेने विचार करावा. “ तो साधू आणि विंचवाची गोष्ट आहे ना माहीत तुला ? त्या साधूने विंचवाला पाण्यात बुडण्यापासून वाचवले पण लगेच त्या विंचवाने त्याला डंख केला. असे दोनतीनदा झाले तेव्हा हे सगळे बघणाऱ्याने त्या साधूला विचारले – तो विंचू तर प्रत्येक वेळी तुम्हाला डंख मारतो आहे आणि तरी तुम्ही त्याला वाचवत राहता, हे कसे ? यावर तो साधू म्हणाला की तो विंचू त्याचा धर्म पाळतो आहे आणि मी माझा ! “ – हे तर सगळ्यांना माहीत आहे. तू फूट पाडू नकोस ! --  असे सांगणाराही कुठे ना कुठे समरूप म्हणजे आयडेंटिफाय झालेला असतोच – त्या प्रकारे स्वत:ला अलग पाडून – आयसोलेट करून -- तोही फूट पाडत असतोच ! ती फूट धर्माच्या आधारावर नसली तर पक्षीय आधारावर असेल – जसे काँग्रेस फर्स्ट, बीजेपी फर्स्ट, वगैरे. ‘ मी गांधीवादी आहे ‘ असे म्हणणाराही स्वत:ला हिंदुत्ववाद्यापासून वेगळा पाडत असतोच ! यावर काय म्हणणार ? अरे, तो कसा का वागे ना, तू नीट वाग, तू

समंजस, सहिष्णू, समावेशक राहा – जगाला आदर्श घालून दे ! यावर कुणीही काय म्हणणार ? “ बाळा, तुझ्या जगण्यात तू असा ‘ ओळखी ‘ शिवाय, समरूपतेशिवाय जगून दाखव, मग मला सांगायला ये ! "
बाकी जग आणि तत्त्वे गेली तेल लावत ( वा खड्ड्यात ) ) हे पूर्ण मानवजातीचे तत्त्वज्ञान आहे, कळले काय ?
कुणीही कुणालाही काहीही न शिकवता लौकरात लौकर आपला सगळ्यांचा नाश होणे हेच या सर्व प्रश्नांचे निराकरण आहे !
--- हे मी नाही म्हणत – पूर्ण मानवजातीला होऊ शकणारे हे एकमेव सर्वोच्च ज्ञान आहे !
--- ००० ---

माझे अक्षर

माझे अक्षर या विषयावर सांगण्यासारखे माझ्याकडे काही नाही. ते खराबच आहे. त्यामुळे, कालपासून या विषयावरच्या पोस्टींकडे मी जरा न्यूनगंडानेच बघतो आहे. लहानपणी मी अक्षर सुधारायचे प्रयत्न केले पण ते वायाच गेले. आता मी अहिंसक होतो असे म्हणणारा माणूस कसा अधिकच हिंसक होतो तसे ते झाले. माझे अक्षर पाहून ज्यांना ते टाइप करावे लागले असेल त्यांचे मला शिव्याशापच लागले असणार ! पण त्या दरम्यान एक कळले की महात्मा गांधींचे अक्षरही खराबच होते. जोडीला हेही आले वाचनात की सखोल विचारवंतांचे अक्षर हे सामान्यत: वाईटच असते ! तो धागा मी पकडून ठेवला आणि स्वत:ला विचारवंत समजून अक्षराबद्दल माफ करत राहिलो. शाळेत असल्यापासून माझी चित्रकलाही वाईटच होती. आपले अक्षरच इतके खराब आहे तर आपली चित्रकला कशी चांगली असणार – अशी मी स्वत:ची समजून घालत आलो. तरीही, हा विषय डोक्यात असेच. पुढे ओळखी झालेल्या अनेक चित्रकारांना मी हा प्रश्न विचारला होता की वाईट हस्ताक्षराचा माणूस चित्रकार होऊ शकतो का ? तर मला उत्तर मिळाले होते की चित्रकार होण्याचा आणि अक्षराचा काही संबंध नाही. पण, खोटे कशाला बोलू, अजूनही तो प्रश्न माझ्या मनात आहेच ! आता संगणकावरच सगळे काम करत असल्याने या बाबतीत इतरांच्या शिव्या खाणे बंद झालेले आहे. अक्षर छान असल्याशिवाय भावगीते चांगली लिहिता येणार नाहीत असाही एक समज माझ्या डोक्यात ठाण मांडून आहे, पण, भावनिक कविता म्हणजे काहीतरी ग्रेट असे डोक्यात मुळीच नसल्याने त्या विचाराचा फारसा त्रास होत नाही. असो.
--- ००० ---

कै. नरेंद्र चपळगावकर सर

सरांच्या स्मृतीला नमन करून त्यांची एक आठवण --
साहित्य आणि कला हे क्षेत्र पूर्णपणे सामाजिक-राजकीय भूमिकांनी व्यापलेले असायला हवे या सतत कानीकपाळी आपटल्या जाणाऱ्या मूर्ख अपेक्षेला कंटाळून मी ' कलेचे सैनिकीकरण ' हा लेख लिहिला होता आणि तो लोकसत्तेत छापून  आला होता. तो आवडल्यामुळे सरांनी कुठून तरी माझा नंबर मिळवून मला फोन केला होता. सुमारे अर्धा तास ते फोनवर माझ्याशी बोलले होते. मला ते खूप विशेष वाटले. नंतर तोच लेख जरा सविस्तर लिहून आपला मित्र मंगेश नारायणराव काळे याच्याकडे मी दिला. त्याने तो ' खेळ ' या नियतकालिकात छापला होता.

सरांच्या स्मृतीला पुन्हा एकदा नमन

--- ० ---

परत जाणाऱ्या उंटावरच्या शहाण्यांचा हा फोटो मी सहज एक मजा म्हणून काढला होता. काळाच्या ओघात, माझ्या ' जमेल तेवढा तर्क ' या कवितासंग्रहाच्या पाठपानावर त्याला स्थान मिळाले !

बजेट

( १ ) काहीच नाहीय या बजेटमध्ये. देशवासियांच्या तोंडाला नुसती पाने पुसली आहेत. देशाला निश्चितच अधोगतीला नेणारे बजेट. ( २ ) सर्व वर्गातल्या नागरिकांना खुश करणारे आणि देशाचा विकास गतिशील करणारे समाधानकारक बजेट. --- अशा असंख्य अर्थच्छटा  देणारे कवितेसारखे अनेकार्थी बजेट आता लौकरच सादर होईल. ते बजेट पाहिल्यावर जे अर्थ कळायला हवेत ते आधीच तयार ठेवून सर्व विद्वान सज्ज आहेत ! सत्ताधारी आणि विरोधी अशा सर्वच लोकांना पूर्ण ताकदीने साजरा करावासा वाटतो असा हा एक वार्षिक उत्सव !

--- 000 ---

मोझार्टचे रेक्वियम

-- कवितासंग्रह – गणेश कनाटे – वर्णमुद्रा प्रकाशन.

‘ असलाच तर हा प्रश्न आहे ‘ या कवितेतल्या खालील ओळी बघा –

प्रेषित नसलो तरी काय झाले

आपण बोलत राहायला पाहिजे

आपलं कुणीच ऐकत नाही

म्हणून काय बोलणंच सोडायचं ?

-- असलाच तर हा प्रश्न आहे

--- मराठीत हा प्रश्न अनेक कवींना आहे, हे आपण जाणतोच. सामाजिक-राजकीय भूमिका घेऊन लिहिणारे कवी, सामान्यत: बोधप्रद लिहिणारे कवी आणि रोमँटिक मनोरंजन करणारे कवी – हे सोडले तर इतर सर्वच कवींना हा प्रश्न पडू शकतो. वाचणार कोण ? भय आणि मृत्यू हे मानवी जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न आहेत, असा प्रास्ताविकात उल्लेख आहे. या प्रश्नांना, माहीत असणारी कोणतीही वैचारिक उत्तरे देऊन उपयोग नसतो, तसे त्यांचे निराकरण होत नाही. प्रत्येक वेळी नव्याने शोध घेण्याचे हे विषय असतात, इतकेच नव्हे तर, हे कधीच न संपणारे विषय असतात. अशा खोलात जाणाऱ्या कविता वाचणार कोण, हा प्रश्न मराठीत. भाषा तेवढी तगल्यास, अजून पाचशे वर्षे तसाच राहील, असे दिसते आहे.

ते काहीही असो, मराठी कवितेच्या रटाळ मर्यादांतून ही कविता बाहेर पडू इच्छिते म्हणून तिचे स्वागत करायला हवे.

तरीही, या कवितांत अनेक ठिकाणी, ‘ चांगली कविता ‘ कशी असायला हवी याबाबतची कवीची वैचारिकता कविता लेखनाच्या प्रक्रियेवर आक्रमण करताना दिसते. तसे घडते तेव्हा ती ती कविता तिची सर्जकता गमावून बसते, हे इथे नोंदवायला हवे. मला आवडलेल्या, या संग्रहातल्या कविता खालीलप्रमाणे आहेत –

हा रस्ता माझ्या पायांत गुंतून तर जाणार नाही ? ( पान ३२ )

एका अर्ध्यामुर्ध्या माणसाची सोबत ( पान ३४ )

न्यायनिवाडा, शिक्षा आणि प्रार्थना ( पान ७८ )

भीती वाटते ( पान ९० )

कवितांची मोठमोठी शीर्षके नावीन्यपूर्ण वाटतात.

या कविता कोणत्याही परिवर्तनासाठी, नैतिक तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी वा फडजिंकू करमणुकीसाठी लिहिलेल्या नाहीत. या अर्थाने या मानवी जगण्याच्या कविता आहेत.

कविता लिहिताना या कवीमधला समीक्षक शांत राहिला तर या कवीकडून खूपच मौल्यवान कविता येत राहतील, असे वाटते.

चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मुखपृष्ठ उत्तम !

--- ००० ---

मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे संचालक योगेश सोमण, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष अविनाश ऊर्फ भाऊसाहेब तळेकर, डॉ. शरद भुताडिया, मी, बाबा वर्दम थिएटर्स च्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य, बाबा वर्दम थिएटर्स चे संस्थापक चंदू शिरसाट --- पुरस्कार वितरण सोहळा, दिनांक -- ०४-०२-२०२४.

एक सव्वाशे दीडशे पानांची कादंबरी कशी ग्रेट असू शकते ते पहा –

( आल्बेर कामूची ‘ द स्ट्रेंजर ‘.

माझे अपयश

माझ्या लेखनाच्या बाबतीतल्या काही चांगल्या घटना जशा मी तुम्हाला सांगतो तशाच वाईट घटनाही सांगायला हव्यात, म्हणून ही पोस्ट. राज्य शासनाचे, यशवंतराव चव्हाण वाङमय पुरस्कार जाहीर झाले आहेत. या पुरस्कारासाठी मी नाटक विभागात, ‘ पाच ॲब्सर्ड नाटके ‘ हे माझे पुस्तक आणि समीक्षा या विभागात ‘ आवर्तने ‘ हे पुस्तक पाठवले होते. मीच प्रकाशक-लेखक असल्याने प्रथमच मी हा उद्योग केला होता. पुरस्कारांच्या यादीप्रमाणे माझी ही दोन्ही पुस्तके पुरस्कारासाठी अपात्र ठरलेली आहेत. अर्थातच, असे काही ना काही घडत राहणार – चलते रहना है !

--- ००० ---

साहित्य अकादेमी पुरस्कार

या पुरस्कारांसाठी आधी, त्या त्या भाषेतल्या ‘ तज्ञ ‘ समितीकडून शिफारशी मागवल्या जात – त्यांत गटबाजी होते अशा तक्रारी आल्यामुळे यंदापासून लेखक, प्रकाशक, हितचिंतक असे कुणीही पुस्तके पाठवू शकणार आहेत. मी माझे ‘ चार पुरुषार्थांची चार नाटके ‘ हे पुस्तक पाठवायच्या विचारात होतो. पण, आता विचार असा येतोय की पुस्तक तिथे पोचेल हे ठीक पण पात्रता ठरवायला ते इथल्याच तज्ञ / विद्वान / अभ्यासकांकडे येणार ! माझा हेतू असा होता की आपली पुस्तके आपणच प्रकाशित करण्यातला काही खर्च निघेल आणि मुख्य म्हणजे पुस्तक पुरस्कार-पात्र ठरल्यास अनेक भारतीय भाषांत ते अनुवादित होते ! ते सगळे ठीक. पण, मराठी तज्ञांच्या लेखी आपण काय आहे हे मी विसरू नये, असे आता वाटते. त्यामुळे, साहित्य अकादेमीकडे पुस्तक पाठवण्याचा विचार मी रद्द केलेला आहे ! आपली झाकली मूठ चालली आहे, तेच बरे आहे, असा सूज्ञ विचार आता प्रभावी ठरतो आहे !

--- ००० ---

मी काही महिन्यांपूर्वी लिहिलेली एक कविता --

उपासना

कवितेजवळ असायला हवे
दु:खाचे भरभक्कम लगेज
ती दु:खपूर्ण असायला हवी
दु:खाचा प्रगाढ अनुभव देणारी
ती दु:खाने दु:खाला बळकट करणारी हवी
दु:ख जोपासायच्या पद्धती तिने द्यायला हव्यात
सद्गदित करणे रडू आणणे सहानुभूती कीव वाटणे हवे
मंद प्रकाशात भिनायला हवे कवितेचे मादक दु:ख
हे आपलेच आहे हेच तर जगणे
हेच तर जीवनदर्शन असे व्हायला हवे
तिने निचरा करायला हवा विचारांचा थकवायला हवे
चेहरा काळवंडून टाकायला हवा
दु:खाशिवाय कविता असेलच कशी
दु:ख हीच कविता तेच त्या विषाचे तीर्थक्षेत्र
असायला हवे तिने अनेक
दागिने आणि चमत्कृती लेवून यायला हवे
आत सुंदर दु:खाचा लुसलुशीत गर मिळायला हवा
भावनेशिवाय कविता नाही आणि सर्वोत्तम
तीव्र भावना कोणती असणार दु:खाचीच ना

कवी हळवे असतात त्यांना दु:ख खूप असते उपलब्ध
मग ते म्हणतात दु:खात बुडवून खून करायचा
प्रयत्न न करणारी कविता ही उथळ असते
तिला खोली नसते ती पृष्ठस्पर्शी
खेळ करते नुसते उडाणटप्पू
कलेची एकूणच भरभराट होऊन लोक सतत
दु:खाचे आदी झाल्याशिवाय संस्कृती घडणारच नाही
हळवे भावनाशील ताणलेल्या चेहऱ्यांचे राहिल्याशिवाय
जे चालू आहे ते रद्दड जगणे पुढे कसे नेता येईल
हा बोध नव्हे ही सत्याची उपासना आहे
--- ००० ---

हे एक लिहिले होते बघा ---
रॅपगीत
झालो मेकॅनिकल टाकली पोल्ट्री
उद्यापेक्षा आहे आमची व्ह्याल्यूएबल हिस्ट्री
कितीतरी पोरींशी चालू आहे मिस्ट्री
एकीने मोडले तर तिसरीशी मैत्री
त्यापेक्षा झालो असतो रतन खत्री
तर लगेच झालो असतो घरमंत्री
राहिलेच गाठायचे इच्छेचे टोक
भोग आता भोग जिंदगीभर भोग ( १० वेळा )
उलटेपालटे पुढारी
भरकटलेले प्रवक्ते
पेड संपादक अर्धवट जाणकार
बिनधास्तपणाचे अचाट प्रयोग
भोग आता भोग भोग आता भोग
दोष कुणाचा शोधून काढू
कुणाची फाडायची तो निकाल लावू
कुणाला जेल कुणाला फाशी
कोण गद्दार कोण गॉडफादर
कुणी लुटली महानगरपालिका

कुणी राज्य कुणी सेंटर
सगळेच म्हण योगायोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग
माऊस तुटलाय स्क्रीन तडकलाय
नेट बोंबललेय वीज गेलीय
डोक्यातली कनेक्षन्स पायात गेलीयत
मेंदूची हाडे गुडघ्यांत सडलीयत
विचारांनी पुरोगामी सगळी
जातींत कुजलीयत जातींत सुजलीयत
एकतेचे बोलताहेत फूटपाडे रोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग
पैसे कसे वापरायचे अमेरिकेवर अवलंबून
गांड कशी धुवायची चीनवर अवलंबून
भेसळ कशी करायची ती अक्कल पाहिजे
माल विकून पळून जाता आले पाहिजे
गुंड पाळ शस्त्रे मिळव
पोवाडे गा स्वातंत्र्याचे
आपापल्या टोळ्या पक्क्या ठेव
पंचतारोंके बिल देनेकी हिंमत रख
पानी पीके कोई मटन खाता है भला
इकडची मागव तिकडची मागव
त्यांना बाटली तुला बाई मागव
उद्याचा भरोसा गेला तेल लावत
इथेच भोग आजच भोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग
साखरसम्राट शिक्षणसम्राट
कास्टिंग सम्राट बाजार सम्राट
रस्त्यावरच्या टपऱ्यांचे पालिका सम्राट
पोलिस सम्राट दुकानदार सम्राट
बॉस सम्राट सगळेच सम्राट
तू कुछ नही तू सिर्फ लोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग

भाषणे सुंदर ऐकलीच पायजेत
उपकार घेतलेस मते दिलीच पायजेत
भल्याचा विचार सोडून दे
उद्याला काडी लावून दे
दाराला कडी लावून घे
कोंडून बस दारू पी
जगाचा विचार सोडून दे
हाही सोडून दे तोही सोडून दे
विचारच सोडून दे विचारच सोडून दे
सगळाच जाऊ दे सगळाच सोडून दे
विचाराचा आहे शून्य उपयोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग
तुला फक्त आहे शवासन योग
--- ००० ---

माझ्या एका कवितेतल्या ओळी --
देवावर नाही पण
बुद्धीवर तरी विश्वास
ठेवावाच लागतो तुला त्याच बुद्धीने
--- ००० ---

" किंबहुना मराठीच्या प्राध्यापकाला हल्ली काही येत नाही, हे मी ४५ वर्षे मराठीची प्राध्यापकी केल्यानंतर आणि निवृत्तीनंतर २५ वर्षांनी जबाबदारीनं, अधिकारवाणीनं म्हणू शकते. "
--- नियोजित मराठी संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर.
( आज दि. १६-०२-२५ च्या पुणे मटात आलेल्या त्यांच्या मुलाखतीतून. )

' प्रेमच म्हणू याला हवं तर .. ' या माझ्या नाटकाचा उत्तम प्रयोग करायचे हे दोघेही -- ललित प्रभाकर आणि मंजिरी पुपाला.

हा लेख खूप महत्त्वाचा वाटतो – लीना पांढरे --

कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे श्यामभटाची तट्टाणी !.

जयपुर लिटरेचर फेस्टिवल आणि मराठी साहित्य संमेलन याची तुलना करणारे काही लेख वाचनात आले.

यावर्षीचा जयपुर फेस्टिवल मी पूर्णवेळ अटेंड केला आहे . नाशिकला झालेली दोन साहित्य संमेलने आणि अमळनेरचे साहित्य संमेलन असा तुटपुंजा अनुभव गाठीशी आहे .

या दोन संमेलनाची तुलना करणे योग्य वाटत नाही .

जयपूरचा लिटरेचर फेस्टिवल हा फक्त लिटरेचरशी संबंधित नव्हता . पर्यावरण, थेटर, म्यूझिक, पत्रकारिता , समलिंगी ते जागतिक वाङ्मय Anything under the sun. ! असा त्याचा मोठ्ठा कॅनव्हास होता . आपण गुगलवर त्याची कार्यक्रम पत्रिका उपलब्ध आहे ती पहावी.

हा फेस्टिवल एका पंचतारांकित हॉटेलमध्ये पार पडला . जयपुरसारख्या देखण्या राजधानीच्या शहरात जेथे विमान तळासकट रेल्वेपर्यंत आणि असंख्य थ्री /फोर / फाईव्ह स्टार आणि साध्या हॉटेल पर्यंतच्या असंख्य सुविधा उपलब्ध असणाऱ्या ठीकाणचा एक ॲरिस्टोक्रॅट , एलिट मंडळींचा हा उत्सव . (अमळनेरच्या मराठी साहित्य संमेलनात लेखक व प्रकाशक धुळे आणि जळगाव येथील हॉटेलमध्ये राहून रोज जाऊन येऊन उपस्थित राहत होते.)

जयपूर फेस्टला प्रवेश करायला कितीतरी आधीपासून ऑनलाईन नोंदणी केली जाते .रोजची प्रतिव्यक्ती प्रवेश फी दोनशे रुपये . आत मध्ये गेल्यानंतर चहाचा एक कप घ्यायचा असेल तरी दोनशे रुपये मोजावे लागतात .त्या लखलखाटात पुस्तकं खरेदी करत असताना तेथे आलेल्या काही स्थानिक कॉलेजच्या मुला-मुलींकडून समजलं की त्या पंचतारांकित हॉटेलच्या शेजारीच एक प्रदर्शन सुरू आहे आणि तिथे पुस्तकं अत्यंत स्वस्तात उपलब्ध आहेत .

मी तात्काळ त्या शेजारच्या प्रदर्शनाला जाऊन सलमान रश्दी , हेन्री जेम्स , मुरोकामीपासून अगदी हार्ड बाउंड सोनेरी पानांच्या ॲना कॅरेनीना वगैरे पर्यंतची टॉलस्टॉयची पुस्तके शंभर रुपये किलोने खरेदी करून आणली . मराठी लेखकरावांनी विचार करावा की हे जागतिक लेखक १०० रुपये किलो मग आपले लिखाण म्हणजे पाण्यावरल्या

रेषा नाहीत का! "झुंबरच्या झुंबर पेटवण्याची आपली करंटी अहमहमिका "!

जयपुर फेस्टिवलला टोयोटा सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्स, इलेक्ट्रिक बाइक्स, अत्यंत उंची व्हिस्की अशा अनेक भांडवलदारांनी भांडवल पुरवलेले होते .उंची मद्याच्या जाहिराती सर्वत्र झळकत होत्या .पुन्हा तेथे जयपुरमधील कलाकुसरीचे सामान , कपडे , गालीचे , चित्रे , शिल्पे , दागिने यांचेही अनेक स्टॉल मांडलेले होते . पुस्तकाच्या दालनाच्या मानाने बाकीचे स्टॉलच अधिक होते .

अनेक बुकर विनर लेखक , विदेशातील प्रत्यक्ष युद्धभूमीवरून वार्तांकन करणारे पत्रकार , उद्योगपती आणि प्रेक्षकांमध्ये सुद्धा अनेक विदेशी पाहुणे उपस्थित होते .वसाहतवादामधून बाहेर न आलेले ,बावचळललेले एखाद दुसरे भारतीय गोऱ्या कांतीच्या ,सोनेरी केसांच्या अपुऱ्या फॅशनेबल कपड्यातील असंख्य ललना आणि बुवे यांच्यासह फोटोसेशनही करत होते .पण ते प्रमाण अत्यल्प होतं .

तोंडी लावण्यापुरता एखादा शाह्रू पाटोळेंचा कार्यक्रम , कुणी अफ्रीकन रेफ्युजी , सैबेरीयावर लिहीणाऱ्याचे तुरळक कार्यक्रम होते. पण बोलताना सारे पंचतारांकीत वक्ते आपण कसं सामान्य तळागाळातील जनतेशी जोडलं जायला हवं ते हीरीरीने सांगत होते .

जावेद अख्तर, सुधा मूर्ती ,अमोल पालेकर अशा सेलिब्रेटींचाही भरणा होता .सुधाबाईंमुळे नारायण मूर्ती , ऋषी सुनक अश्शी मंडळी श्रोत्यांमध्ये होती . भिडे गुरुजींच्या पाया पडणाऱ्या सुधा ताईंनी जावेद अख्तरनाही वाकून नमस्कार करण्याचे नाट्य पार पाडून टाळ्या मिळवल्या .

विवेकानंदांच्या हिंदुत्ववादाचा छुपेपणाने प्रसार करणारा अप्रतिम इंग्लिश असणारा आणि आपल्या मुलाखतीत आपल्याच राजकीय पक्षाचा नेता राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन भारतीयांवरती टीका करायला नको होती . असं मत नोंदवणारा कुंपणावरचा इंद्रधनुष्यी देखणा रुबाबदार अतिबुद्धीमान परंतु पक्षाचे अध्यक्षपद आपल्याला न मिळता कुणा दुसऱ्याला मिळाल्यामुळे कुठेतरी मनोमन दुखावला गेलेला शशी थरूर नामे रंगबदलू सरडासुद्धा होता .वक्ता दससहस्त्रेषु असल्यामुळे तो प्रत्येक वाक्याला टाळ्या घेत होता. त्यांने एका दिवसात तीन कार्यक्रमात परफॉर्मन्स देऊन टाळ्याच टाळ्या मिळवल्या . ( मला जयपुर फेस्टिवल कळला तो मुळात या शशी थरूर सुनंदा पुष्कर वगैरे कारणांमुळे .सुनंदा जेव्हा वर गेली तेव्हा हे महाशय जयपुर फेस्टिवलला आलेले होते. )

असंख्य विविध वयोगटातील स्त्रियांप्रमाणे जेव्हा फक्त भाषेच्या फुलोऱ्यावर लट्टू होण्याचं माझं वय होतं तेव्हा शशी थरूर माझाही क्रश होता .पण आता मात्र मला जेसलमेरच्या वाळवंटातील बबलू नावाचा उंटच त्याच्यापेक्षा जास्त आवडला .

बहुतेक सारे देशी आणि विदेशी साहेब मंडळीच होते .पण एक गोष्ट अत्यंत प्रांजळपणे मान्य करायला हवी की बहुतेक सारे श्रोते अत्यंत प्रगल्भ आणि चौफेर वाचन असणारे होते. त्यात तरुण मुला-मुलींचा भरणा खूप होता .सिनेमा गझल ,कविता ,नाटक ,पत्रकारिता , आंतरराष्ट्रीय राजकारण कुठल्याही विषयावरती प्रेक्षकांमधून नेमके प्रश्न विचारले जात होते .

ही तरुण मुलं-मुली आणि बाकीचा प्रेक्षक वर्ग अत्यंत संपन्न आर्थिक परिस्थितीतील इंग्रजी हिंदीसह इतर विदेशी भाषांचा ज्ञान असणारा आणि जाण असणारा असा होता . डच भाषेतील साहित्य वाचलेले श्रोते बंगाली आणि हिंदी कार्यक्रमानाही दाद देत होते आणि त्याही भाषां त्यांना अवगत होत्या !

आपले मराठी साहित्य संमेलन सरकारी बिदागीवर अवलंबून . विरोधी पक्षांचे राजकारणी सुद्धा साहित्यिकांच्या (अ )विचार मंचावर गळ्यात गळे घालणार व आपण टाळ्या पिटणार . सौदर्य साधना , आरोग्य ,अध्यात्म ,वास्तूशास्त्र , जिवनात यशस्वी होण्याचा.. मुलमंत्र देणारी पुस्तकंच आपल्याकडे जास्त खपणार .पुन्हा सूत्रसंचालक , उपस्थित साहित्यिक ,लेखक , कवी यापैकी बरेचजण वशिल्याचे तट्टू ! मांगल्य सांडत जाणारे आणि डोळ्यांमध्ये अश्रू आणणारे माहेरची साडी टाईप अलका कुबल लेखक आपल्याकडे पॉप्युलर होतात . त्यांच्या अशा कादंबऱ्यांचा प्रचंड खप झाल्यामुळे गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नक्की मराठी लेखक नोंदवले जाणार आहेत.

प्रगल्भ वाचक वर्ग हा प्राथमिक शाळेपासून घडवावा लागतो . त्यासाठी शिक्षक /प्राध्यापक यांनी शेअर मार्केट फ्लॉट कार्स खरेदी ,बंगले ,देशी विदेशी पर्यटन यातून मन काढून विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अध्यापनासाठी वेळ द्यावा लागतो ..आम्हा मास्तरांना वेतन आयोग देऊन पूर्ण वाया घालवलेलं आहे. पूर्वी शाळा कॉलेज विद्यार्थी

एवढंच आमचं सोशल लाईफ होतं आणि तेच योग्य होतं .आपले अभ्यासक्रम, आपण स्वतः आणि आपल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवत असणारे वाचनाचे छंद ,आपल्या विद्यापीठात होणारे परिसंवाद आपल्याकडे घेतल्या जाणाऱ्या आंतरशालेय आणि आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचा स्तर काय दर्जाचा आहे ? कुठून येणार मग प्रगल्भ श्रोतावर्ग ? असो ...

-लीना पांढरे

--- ० ---

' एक गगनभेदी किंचाळी ' या ' नाट्यशुभांगी ' ने केलेल्या माझ्या नाटकाला अनागरी राज्यनाट्यस्पर्धेत राज्यातले प्रथम पारितोषिक मिळाले होते, हे आठवले ! प्रा. अरुण पाटील हा माझा चांगला मित्र होता.

कै. प्रा. अरुण पाटील

अरुण पाटीलशी माझी ओळख विजय कारेकरमुळे झाली असावी किंवा तो आमच्या कोल्हापूरच्या नाट्य-ग्रुपमध्ये येत असे तिथे झाली असावी. पुढे ती मैत्री कायम राहिली. अरुण, विजय, दिलीप जगताप आणि मी अशी आमची अमर चौकडी होती. अनेकदा आमच्या भेटीगाठी, गप्पा होत असत. अनेकदा तर आम्ही अरुणच्या घरीच साग्रसंगीत भेटायचो. त्याच्या घरी तयार झालेल्या चिकन-मटणासह. एक-दोनदा मी सांगलीला अरुणबरोबर त्याच्या तिथल्या बंगल्यावरही राहिलो होतो. तिथे तो एकटाच असे. तो येणार म्हटल्यावर बंगला चकाचक करून ठेवणारी त्याची टीम होती. तिथेच, त्याच्यामुळेच, माझी हातकणंगलेकर सरांशी ओळख झाली. ते अरुणचे जुने मित्र होते. सरांबरोबर संगीत गप्पा ही एक विशेष मेजवानी असे. आज संजय पाटीलने, जयसिंगपूरच्या ‘ नाट्यशुभांगी ‘ या नाट्य संस्थेबाबत दिलेल्या पोस्टमुळे हे सगळे आठवले. संजयने माझे ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे नाटक राज्य साठी सांगलीत बसवले होते. अत्युत्तम प्रयोग होई. त्यातला विवेक देशपांडे यांचा कर्नल तर अनेकांच्या डोक्यांत अमर असेल ! अरुण आणि संजयही मित्र होते. मी सांगलीत आलो आहे हे कळल्यावर संजयने फर्मान सोडले की दुसऱ्या दिवशी मी आणि अरुणने आकाशवाणीवर यावे – तिथे तो नोकरी करत होता – आणि तिथे अरुण माझी मुलाखत घेईल – ती रेकॉर्ड करून सांगली केंद्रावरून ती प्रसारित होईल ! त्याप्रमाणे अर्थात सगळे पार पडले.
अरुणने ‘ नाट्यशुभांगी ‘ या संस्थेतर्फे बसवलेले माझे ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ हे नाटक अनागरी राज्य नाट्य स्पर्धेत राज्यात पहिले आले ही एक अरुणमुळे घडलेली चांगली घटना. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत बरीच स्त्री-पुरुष पात्रे होती. अरुण हातात पट्टी घेऊनच तालमी घेत असे असे मी ऐकून आहे. ते ठीक. अरुणचे माझ्या आयुष्यातले त्याहून मोठे देणे म्हणजे माझे पहिले दोन अंकी नाटक सांगली बँकेतर्फे त्याने रंगमंचावर आणले ! नाटकाचे नाव होते, ‘ राज्य ‘ . आपल्या नाटकासाठी नेपथ्य मांडले जातेय, प्रकाश योजनेचे टेस्टिंग होतेय – हा पहिला अनुभव अरुणमुळे मिळाला ! ते नाटक मुळीच चांगले नव्हते. म्हटले तर रद्दडच होते. नंतर मी ते कुठेही सामील केले नाही. ती संहिता एक प्रकारे फेकूनच दिली. आमचा कोल्हापूरचा ग्रुप म्हणजे निर्दय, चिकित्सक होता. मीही तसाच होतो. त्या नाटकाचा प्रयोग झाल्यावर माझ्या प्रेमळ मित्रांनी माझी यथेच्छ खिल्ली उडवली होती ! अर्थात ते योग्यच होते.

तरीही, माझे पहिले दोन अंकी नाटक रंगमंचावर आणणारा दिग्दर्शक-मित्र म्हणून अरुण कायम माझ्या स्मरणात आहे – राहील.
या निमित्ताने अरुणच्या स्मृतीला अभिवादन !
--- ००० ---

मनाच्या दुःखांचा साचलेला डोंगर पोखरायचा असेल तर नक्की या चं. प्र. देशपांडेंचा"मन" हा दीर्घांक पहायला !

डोक्यात माहिती, अनुभव भरत जाणे ! आयनेस्को ची एकांकिका ' द न्यू टेनंट ' बघा.
नेटवर उपलब्ध आहे.

स्वमताबाबत अत्यंत टची ( फारच हळवे ) असणे म्हणजे अभिव्यक्तिस्वातंत्र्यवादी असणे !

अनेक पुढारी एकमेकांना -- " गप्प बसा, आमच्या नादी लागू नका, नाही तर तुमचे सगळे बाहेर काढू ! "

सतत सामूहिकतेत व्यग्र असणाऱ्या व्यक्तीची सांस्कृतिक वाढ खुंटते.

'मन'
(एकपात्री दीर्घांक. प्रयोग कालावधी सलग दीड तास.)
शुक्रवार, दिनांक ७ मार्च
संध्याकाळी ७:३० वाजता
साळगावकर रंगमंच, यशवंत नाट्य मंदिर, दादर
सर्व प्रयोगांच्या तिकीटांकरता संपर्क ०९९६७०८५५०५

एका साध्या भोळ्या मित्र संमेलनात, माझे ' मन ' हे नाटक अनेकांना आवडले म्हणून मित्रांनी मला गुच्छ दिला ! ( सर्व निवृत्त बँक कर्मचारी ).

मराठीतून केलेली कुचेष्टा आणि द्वेष वाचणारे जसजसे कमी कमी होत जातील तसतशी ही भाषा मरत जाईल ! तिचा दुसरा काही महत्त्वाचा असा फारसा उपयोग दिसत नाही !

मराठी आणि मराठी साहित्य, असे इथे जमा न होवो हीच या मराठी दिनी हार्दिक शुभेच्छा !
( रद्दीच्या दुकानाचा फोटो )

मराठी आणि मूल्यविचार

कोणत्याही एखाद्या हस्तपत्रकापासून ते खानोलकर, जीए, धुरी, तुकाराम – या सगळ्यालाच आपण वाचन-संस्कृती म्हणतो. रोग, यशाचे मंत्र, खाद्य वैविध्य – असे काहीही वाचले तरी ते मराठी साहित्याच्या वाचनात आपण स्वीकारतो – अशी सर्व प्रकारची पुस्तके खपत राहणे याला आपण वाचन समृद्धी म्हणतो. मराठी साहित्याच्या दृष्टीने या अराजकी कल्पना आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. कारखान्यात, दुकानात वा हॉटेलातही दर्जा, गुणवत्ता या मुद्याला महत्त्व असते. फक्त साहित्य याला अपवाद कसे असू शकेल ? मूल्यविचार हा गेल्या काही वर्षांत साहित्यातून हद्दपारच झाल्याचे दिसते. त्यामुळेच, समीक्षेचा अभाव आहे. मूल्यविचाराचे महत्त्वच गेलेले असल्याने वाङमयीन लेखन, नियतकालिके मृत्यू पावलेली आहेत. गेल्या काही वर्षांतली साहित्य संमेलनांच्या अध्यक्षांची भाषणे पाहिली तर हा मूल्यविचाराचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. साहित्याचे मूल्य हे समाजातला थर, जात वा प्रदेश, गट वा टोळी यांवर अवलंबून नसते, हे लक्षात घ्यायला हवे. अशा मूल्यविचाराचे महत्त्व नसेल तर त्या भाषेची सर्वांगीण अवनती होणे अटळ आहे.

--- ००० ---

मागल्या आठवड्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नामदेव सभागृहात "खेळ खल्लास" पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झाला. (याआधी डिसेंबरमध्ये पुणे पुस्तक महोत्सवात बुक लाँच झाले होते.) विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे विभाग प्रमुख आणि माझे मित्र प्रवीण भोळे यांनी अगदी अगत्य पूर्वक कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रकाशनाआधी ललित कला केंद्राच्या काही विद्यार्थ्यांनी नाटकातल्या निवडक भागाचे समरसून अभिवाचन केले. पुस्तक प्रकाशन देखील या विद्यार्थ्यांच्याच हस्ते करायचे आम्ही आधीच ठरवले होते. त्यामुळेच या विद्यार्थ्यांच्याच हस्ते प्रकाशन झाले. अभिवाचनात मित्रवर्य प्रवीण भोळेने लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेचा आणि आदरणीय चंप्र देशपांडेंनी लिहिलेल्या ब्लर्बचा भाग देखील समाविष्ट केल्याने नाट्य आकलन सुलभ झाले.

( गिरीश रांगणेकर )

वाचन

मराठी साहित्याचा परिसर तसा लहान असला तरी संख्येने खूप मोठा आहे. कुणालाही ते सगळे वाचून, अभ्यासून त्या बाबतीतला आपला आवाका वा आकलन मांडणे अवघड आहे. कुणी कादंबरीचे विशेष अभ्यासक असतात, कुणी कथेचे तर कुणी कवितेचे. ही सवलत कोणत्याही साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाला द्यायलाच हवी. बरे, समजा कविता हा रचनाप्रकार घेतला तर त्यातलेही काही शे वर्षांचे अभ्यासून बोलणेही अवघडच आहे. पण, समजा गेल्या पन्नास वर्षांतल्या कविता किंवा गेल्या पाच वर्षांतल्या कविता – एवढे तरी ' पुन्हा एकदा ' अभ्यासून बोलता यावे असा चारसहा महिन्यांचा वेळ अध्यक्षांना उपलब्ध असतो. बरे, तेही जाऊ दे – गेल्या काही वर्षांत तुझ्या वाचनात आलेल्या चार चांगल्या कविता कुठल्या बाबा आणि त्या तुला का चांगल्या वाटतात, हे तरी सांग. एक महत्त्वाची वाटलेली कादंबरी वा कथा वा कविता – कशावरच नाही बोलणार ? चांगले काय आहे, आपण ते काय, कसे

वाचायला हवे – असे काही समजेल या आशेने तिथे जमलेला बहुजन श्रोतृवर्ग अध्यक्षाचे भाषण कानात प्राण आणून ऐकत असतो. अध्यक्षाने त्याची पूर्ण निराशा करावी, हे योग्य नाही.

हे बोलायचे कारण म्हणजे गेल्या काही संमेलनांचे अध्यक्ष वाचकांची / श्रोत्यांची अशी निराशा करत आलेले आहेत. साध्या एखाद्या कवितेबद्दलही तुम्ही बोलणार नसाल तर हे चुकते आहे. मग हे या खुर्चीवर का आले, असा प्रश्न येणार. एखादा असेही म्हणणार की अध्यक्षा, तू चुकलास, निष्कारण ही जागा बळकावलीस !

आता ही एवढी अपेक्षाही जर अवाजवी असेल तर अध्यक्षाचे काम तरी काय समजावे, असा प्रश्न येतो.

--- ००० ---

महत्त्वाची सूचना --- ०३-०३-२५

माझा फेसबुक अकाऊंट हॅक झाला आहे किंवा माझ्या नावे दुसरे एक खाते उघडण्यात आले आहे, असे दिसते. माझ्या नावाने येणाऱ्या कोणत्याही मेसेजकडे दुर्लक्ष करावे, ही विनंती.

आणखी एक महत्त्वाची सूचना --- ०३-०३-२५.

माझ्या नावाने एक फेसबुक फेक अकाउंट काढले गेल्याची पोस्ट मी आधीच दिली आहे. तसे आणखी एक फेक अकाउंट काढले गेल्याचे आत्ताच कळले आहे. माझ्या नावे आलेल्या कोणत्याही मेसेजकडे दुर्लक्ष करावे, ही विनंती.

प्रवीण कांबळे

माझा नाशिकचा मित्र आणि अविरत नाट्यकर्मी प्रवीण कांबळे तरुण वयातच हृदय विकाराने निवर्तल्याचे कळले. हे फार वाईट झाले. त्याच्या पत्नीकडून मला हे कळले आणि वाईट वाटले. आमची समक्ष भेट कधी झाली नव्हती पण त्याच्या कार्यकर्तृत्वाकडे मी नेहमीच पाहात असे. अत्यंत उमेदीचा हा नाटकाची तीव्र आच असलेला असा हा मराठीतला एक उत्तम नट / दिग्दर्शक आणि नाट्यसंस्था चालक आपल्याला सोडून गेलेला आहे. माझ्या ' स्टालिन ' या एकांकिकेचे दीर्घांक स्वरूपात त्याने बरेच प्रयोग केले.

प्रवीणच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. प्रवीणच्या स्मृतीला माझे अभिवादन !

--- ००० ---

'मन'

(एकपात्री दीर्घांक. प्रयोग कालावधी सलग दीड तास.)

उद्या शुक्रवार, दिनांक ७ मार्च

संध्याकाळी ७:३० वाजता

साळगावकर रंगमंच, यशवंत नाट्य मंदिर, दादर

तिकीटांकरता संपर्क ०९९६७०८५५०५

प्रेमा साखरदांडे

‘ आविष्कार ‘ निर्मित आणि विजय केंकरे दिग्दर्शित माझ्या ‘ ढोलताशे ‘ या नाटकातली ‘ काकू ‘ ही भूमिका जोरकसपणे सादर करणाऱ्या प्रेमा साखरदांडे निवर्तल्या आहेत. त्या नाटकातल्या नाट्याला योग्य तो बढावा आणि ताण देणे हे त्या भूमिकेचे काम होते. त्या ती भूमिका चोख पार पाडत. ज्यांनी ते नाटक पाहिले असेल त्यांना त्यांचा खालील संवाद आठवत असेल --

“माझं जीवन सगळं हालअपेष्टांत गेलेलं आहे हे लक्षात ठेवा -- पोरं लहान असताना हे वारले -- पोरांना मोठं करणं, शिकवणं, त्यांच्या नोकऱ्या, लग्नं ही सगळी काही खाऊची गोष्ट नाही -- माझ्या भावाची मदत घेऊन केलंय मी सगळं -- किती त्रास झाला असेल -- कशा परिस्थितीतून जावं लागलं असेल -- विचार करा जरा -- मला या वयात आता तत्त्वज्ञान सांगत बसू नका -- इतकं दु:ख सहन करणं -- अपमान सहन करणं -- मधनंमधनं मुलांची आजारपणं काढणं -- यांनी कशी मन:स्थिती होईल माणसाची -- जरा विचार करा -- कुण्णाचा उपयोग नसतो अशा वेळी -- मुलं मोठी झाल्यावर, त्यांना नोकऱ्याबिकऱ्या लागल्यावर पुन्हा सगळे जवळ करतात -- अडचणीच्या वेळी लांबच राहतात सगळे -- इतकं सगळं मनाविरुध्द सहन करत आलेय मी -- आता मला त्रास देऊ नका -- मीसुध्दा संतांचं वाचलंय -- नामस्मरणसुध्दा करते -- पण ते वेगळे, आपण वेगळे, आपण काही संत नाही -- आपण फक्त सामान्य माणसं ! -- कळलं ? “

शिक्षणात नाट्यतंत्राचा कसा उपयोग होऊ शकतो यावर त्यांनी काही पुस्तकेही लिहिलेली आहेत.

प्रेमा साखरदांडे यांच्या स्मृतीला माझे आदरपूर्वक अभिवादन !

--- ००० ---

राहुल पुंगलिया --

काल चंप्रंनी त्यांचा नवीन कवितासंग्रह इटालियन जॉबचा शेवट मला आणि डॉ. गिरीश रांगणेकरांना भेट दिला. इटालियन जॉब हे मायकेल केनच्या एका सिनेमाचे नाव आणि त्याचा शेवट अधांतरी आहे अनेक अर्थाने. त्यामुळे चंप्रंच्या काव्यशास्त्राला शोभेलसे शीर्षक आहे. त्यानिमित्ताने या संग्रहातील काही कविता

मी न आठवलेल्या पण पडून

असलेल्या  मनात माझ्या जखमा

असतील भाषेशिवाय

 असतील बाबा

आठवताच येत असतील त्या

 भाषेच्या रूपात

मग काय महत्त्व आहे

 भाषेवर विश्वास ठेवण्याचे

कविताही मुळातली

 भाषेशिवायच समजायला हवी

की काय
लिहिताना मात्र ती भाषेतच येणार
(जगण्यावरचा विश्वास या कवितेमधून )
ही अजून एक कविता
चळवळी
साठोत्तरी कवितेला
हात नव्हते
नव्वदोतरीत तिला
हात फुटले पण
मेंदू थोडासा सडला
एकविसाव्या शतकात
तिला डोहाळे लागले
जागतिक होण्याचे
पण तिचे सांडपाणी
तुंबून राहिले
जानेवारीच्या
सातव्याच दिवसात
तोवर वाचणारे निम्मे
केले वर
आणि निम्मे अडकले
सलूनच्या खुर्च्यांवर
मग हे सगळे
आले भाषेवर
ही भाषाच अशी घडली होती
की झोपडपट्ट्या वाढत होत्या
आणि निर्वासितांचे घोळके
साठत होते मनामनात
कवींचे कळप
शोधत राहिले मार्ग
एकटे राहून
चिंतन करण्याचे
आणि चळवळी थंडावत गेल्या

याचे अपश्रेय कवींचेच की काय

--------

या संग्रहात कोणाला रुची असल्यास त्यांनी खालील फोन क्रमांक वर संपर्क साधावा
9371005773 श्री चं प्र देशपांडे.

मजल दरमजल करत मन दीर्घांकाचा २० वा प्रयोग काल पार पडला. सर्व रसिक प्रेक्षकांचे मनापासून आभार!

गिरीश पतके

'कनक रंगवाचा' या नाट्यविश्वाला वाहिलेल्या नियतकालिकाच्या २०२४च्या दिवाळी अंकाला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा सन्मान मिळाल्याची बातमी आपण नुकतीच वाचली असेल.
याच 'रंगवाचा'चा फेब्रुवारी २०२५चा ताजा अंक आत्ताच मिळाला. हा अंक या नियतकालिकाचा नवव्या वर्षातला पहिला अंक असून आजवर  नाट्यक्षेत्रातील अनेक नामवंत या नियतकालिकामधून लिहिते झालेले आहेत. हा अंकदेखील त्याला अपवाद नाही.
अशी नियतकाालिके चालवणे, त्यामध्ये चांगला मजकूर यावा यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्या व्यक्तींना वाचकांनीदेखील सहकार्य करणे गरजेचे असते. हे नियतकालिक टिकावे, वाढावे यासाठी जिज्ञासू वाचकांनी, नाट्यकर्मींनी या नियतकालिकाचे पालकत्व जरूर स्वीकारावे.
या अंकात ज्येष्ठ नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांच्या एकांकिका व काही नाटके यांवर मी लिहिलेल्या 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार - चं. प्र. देशपांडे' या प्रदीर्घ लेखाचा तिसरा आणि शेवटचा भाग  देखील प्रकाशित झाला आहे.
इच्छा असल्यास जरूर वाचा. आपल्या प्रतिक्रिया मिळाल्या तर आनंद आहेच.

गिरीश पतके ---

द ट्रायल -

काफ्काच्या या जगविख्यात कादंबरीवर चंप्रंनी त्याच नावाचे नाटक लिहिले आहे. त्याबाबत थोडेसे...
जयेश के ला त्याच्या तिसाव्या वाढदिवशी सकाळीच अनपेक्षितपणे कोणतेही कारण न देता अटक झालीये. पण तो त्याची सगळी दैनंदिन कामे करू शकणार आहे. आपणाला झालेली ही अटक बेकायदेशीर असून त्याविरोधात न्याय मागणे हा आपला अधिकार आहे असे म्हणणारा के न्यायालयाच्या दरवाजावर धडका मारतो आणि शेवटी त्यातून आलेल्या सगळ्या निराशाजनक अनुभवातून आपण जन्माला येणे हीच अटक आहे या निष्कर्षाप्रत पोहोचणारा जयेश के हा या विखंडित काळातला न-नायक आहे.

इन्स्पेक्टर - तुला अटक झालीय एवढंच, आहे काय त्यात - तुला याची माहिती द्यायचं काम माझ्याकडे होतं, तर ते मी केलंय -- तुझी शेरेबाजी आणि मतंही ऐकलीयत- काही का असेना, सध्या एवढं पुरेसं आहे आणि इथं आपण एकमेकांचा निरोप घेऊ शकतो, तू तुझ्या कामावरही जाऊ शकतोस -

के - मला जर अटक झालीय तर मग मी बँकेत कसा जाणार?

इन्स्पेक्टर - तुझ्या लक्षातच येत नाहीय अटक झालीय याचा अर्थ, तुझ्या रोजच्या दिनक्रमाला तुझ्या कामांना अडथळा येणाराय असं कुठाय?

के - म्हणजे अटक होणं हे काही फारसं वाईट नाहीय तर?

इन्स्पेक्टर - कोण म्हणतं तसं आहे म्हणून?

के - मग, आता मला सांगा. काही फरकच पडणार नाहीय तर मला सांगायची तरी काय गरज होती?

इन्स्पेक्टर - ती माझी ड्यूटी आहे!

के - गधडेपणाची ड्युटी ! (पृ. ३०३-३०४)

जयेश के ला अटक नेमकी का झाली आहे? त्याचा काय गुन्हा आहे, ही अटक खरंच झालीये, की ते त्याच्या मनाचे खेळ आहेत. ही कसली अटक आहे, ती केवळ त्याचीच आहे का या जगातील सगळ्यांचीच आहे? फक्त के ला त्याची जाणीव झाली आहे व इतरांना तशी जाणीव नाही असे काही आहे का...असे अनेक मूलभूत प्रश्न यातून समोर येतात.

या अटकेविरुद्ध दाद मागण्यासाठी प्रत्येकाला एक दरवाजा असतो आणि त्या दरवाज्यातून प्रवेश करून आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळवायची असतात. फक्त एकच अडचण म्हणजे या दरवाजावरील राखणदारांच्या अडथळ्यांवर प्रत्येकास मात करावी लागते. तो दरवाजा समग्रावधानाचे रूपक वा प्रतिक आहे. हा दरवाजा दैनंदिन समस्यांच्या निराकरणाचा आहे की मानसिक-आध्यात्मिक प्रश्नांच्या निराकरणाचा? याबाबत प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. मात्र अशा विविध 'मी' युक्त दृष्टिकोनांचा उपयोग होत नसल्याने अनेकजण त्या दरवाजापर्यंत जाऊनही त्या पलीकडील सकल्याचा प्रदेश अनुभवू शकत नाहीत. दैनंदिन समस्यांवरील वा मानसिक-आध्यात्मिक प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी बाहेरून मिळणाऱ्या मदतीचा फारसा उपयोग होत नसतो. त्यासाठी 'स्व'चे साकल्याने आकलन होण्याची गरज असते, स्वतःच्या मीपणाचे अस्तित्व नाकारण्यातूनच साकल्यपूर्ण समग्र भानाची प्रक्रिया सुरू होत असते. सार्त्र या 'स्व'लोपालाच नथिंगनेस म्हणतो.

या कलाकृतीतील के खेरीजची इतर पात्रे व प्रसंग खरोखरच अस्तित्वात आहेत, की त्या के च्या मनातील भासयुक्त विविध प्रतिमा आहेत याद्दृष्टीनेही विचार करता येऊ शकतो. ही सगळीच पात्रे विशिष्ट चौकटीत अडकलेली व मिडिऑकर असल्याचे लक्षात येते. त्यांचे असे स्वरूप मानवी जगण्यातील, आजूबाजूच्या भवतालाची निरर्थकता, असंगतता, विदीर्णता आणि अराजकता व्यक्त करते. विदीर्णता पूर्वी नव्हती आणि आताच आहे, असे नसून आता प्रमाणाने ती फारच प्रचंड असून ती दर सेकंदाला जाणवते हे आजच्या जगण्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मनाच्या विषयांची संख्या प्रचंड वाढणे हे त्याचे कारण आहे.

--- ० ---

11-03-25